*नियमित दिवाणी दावा क्रं. ३८४/२०१२*
*दिलीप पाटोळे वि. प्रदिप पाटोळे*

## निशाणी ३३ कडील आदेश

१] वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. मयत वादी क्रं. २ जनाबाई पाटोळे ही वादी व प्रतिवादी क्रं. १ ची आई आहे. ती दावा न्यायप्रविष्ट असताना मयत झालेली आहे. दरम्यानच्या काळामध्ये मयत जनाबाई हिने वादी क्रं. १ च्या लाभामध्ये आपल्या अविभक्त हिश्याचे मृत्युपत्र करुन ठेवलेले आहे. त्या मृत्युपत्राच्या अनुषंगाने वादी क्रं. १ ला जनाबाईचा हिस्सा मिळालेला असल्याने त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२] प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावरच म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादीने नमुद केले आहे की, जनाबाईने करुन दिलेल्या मृत्युपत्राच्या अनुषंगाने वादीने जनाबाईच्या अविभक्त हिश्याचे आपण एकटेच मालक आहोत असा जाहीर ठराव मागितलेला आहे. वस्तुत: जोपर्यंत मृत्युपत्राचे प्रोबेट प्राप्त होत नाही तोपर्यंत वादीला कोणताही हक्क प्राप्त होत नाही. प्रस्तुत कोर्टास प्रोबेट विषयी न्यायनिवाडा करण्याचे अधिकार नसल्याने प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करता येवु शकत नाही. सबब अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

३] वादीने प्रस्तावित अर्जासोबत दि. १०.०६.२०१३ रोजीच्या मृत्युपत्राची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे. प्रस्तुतचा दावा हा सन २०१२ मध्ये दाखल झालेला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, दावा न्यायप्रविष्ट असताना दरम्यानच्या काळात जनाबाईने आपल्या हिश्याचे मृत्युपत्र वादी क्रं. १ च्या लाभात करुन दिलेले आहे. हिंदु वारसा कायदा, १९५६ चे कलम ३० प्रमाणे कोणताही हिंदु मृत्युपत्रानुसार आपली मालमत्ता विभक्त अगर विभक्त हस्तांतरित करु शकतो. प्रतिवादीने केवळ मृत्युपत्र खोटे आहे व त्याचे प्रोबेट प्राप्त झाले नाही व या न्यायालयास अधिकारक्षेत्र नाही अशी हरकत घेतली आहे. ज्याअर्थी दावा वाटपाचा आहे व सदर दाव्यास मृत्युपत्राच्या अनुषंगाने वादी क्रं. १ ला हिस्सा मिळाला आहे अगर कसे हा निगडीत मुद्दा आहे त्याअर्थी वादीने मागितलेली दाद दुरुस्तीने सदर दाव्यात सामील करणे गरजेचे वाटते. त्यामुळे वाद विषयाचा अंतिम व कायमचा असा न्यायनिवाडा करणे सुलभ होणार आहे. सबब प्रस्तुतचा वादीचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मागितलेली दुरुस्ती मुदतीमध्ये करुन दाव्याची दुरुस्ती प्रत दयावी.

३. वादीने मागितलेल्या नवीन दादीबाबत दाव्यात आकारणी करुन नियमाप्रमाणे कोर्ट फी जमा करुन घ्यावी.

सही/–
(वि. फ. चौगुले)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर दौंड, जि.पुणे

दिनांक : २६/०७/२०१६